# BA-III Semester-V

# Geography Paper No. IX-Population Geography

# MCQs

1.लोकसंख्या भूगोल म्हणजे लोकसंख्येच्या **गतिमानतेचे क्षेत्रीय पृथक्करण** होय.

2. जी.टी. त्रिवर्था यांच्या मते, लोकसंख्या भूगोलात **मानवी लोकसंख्या** हाच विषयाचा प्रमुख गाभा आहे.

3. कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्या हा घटक नेहमी **प्रगमनशील** असतो.

4. लोकसंख्या भूगोल ही भूगोलशास्त्राची एक **हेतूनिष्ठ व क्रमबद्ध** अशी उपशाखा आहे.

5. **प्रादेशिक विविधता समजून घेणे** हे लोकसंख्या भूगोलाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

6**. क्लार्क** यांच्या मते लोकसंख्या भूगोलात-

a प्राकृतिक सामाजिक व आर्थिक गुणधर्म, b संख्यात्मक मोजमाप व सर्वेक्षण आणि c लोकसंख्येची गतिमानता ही **तीन महत्त्वपूर्ण अंगे** आहेत.

7. **त्रीवार्था आणि झेलिंस्की** यांच्या मते, **लोकसंख्या भूगोलाच्या व्याप्तीमध्ये**,

a सामाजिक व सांस्कृतिक गुणधर्म, b आर्थिक गुणधर्म आणि

c जैविक गुणधर्म या घटकांचा समावेश होतो.

8. 'पृथ्वीवरील लोकसंख्येच्या वितरणातील प्रादेशिक विविधतेचा अभ्यास म्हणजे लोकसंख्या भूगोल होय' **G.T.Trewartha**

9. "A Geography of Population World Pattern" book written by **G.T. Trewartha**

10. 'लोकसंख्याही स्थल व काल यांची अभिव्यक्ती असल्याने तिचा विचार भौगोलिक घटना म्हणून अभ्यासणे योग्यच आहे' **Trewartha.**

11. **1950 पासून** लोकसंख्या भूगोल या ज्ञानशाखेच्या विकासाला मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली.

12. **लोकसंख्या भूगोलाच्या अभ्यास पद्धती किंवा दृष्टिकोन**

a) क्रमबद्ध अभ्यास पद्धती (Systematic Approach)

b) वर्तन पद्धती (Behavioural Approach)

c) संस्था पद्धती किंवा रचना पद्धती (System Approach)

d) सांख्यिकी पद्धती (Statistical Approach)

e) गणिती किंवा सांखिकी पृथक्करण पद्धती (Statistical Approach)

13. लोकसंख्या वाढ हे भुगोलाचे **गतिमान** अंग आहे.

14. निरपेक्ष आणि सापेक्ष अतिरिक्त लोकसंख्येतील फरक **क्लार्क** यांनी निश्चित केला.

15. **अतिरिक्त लोकसंख्या (Over Population) या संकल्पनेत-**

A) खालच्या दर्जाचे राहणीमान, B) अपुरी उत्पादन क्षमता आणि C) तंत्रज्ञानाचा अभाव या घटकांचा समावेश होतो.

16. उपलब्ध साधनसंपत्तीच्या उत्खनन आणि उपयोजन यांच्या तुलनेत लोकसंख्या कमी असणे म्हणजे **'न्यूनतम लोकसंख्या'** होय.

17. **एकाकी** समाजामध्ये न्यूनतम लोकसंख्या आढळून येते.

18. **विकसित देशांमध्ये** ग्रामीण न्यूनतम लोकसंख्या (Under Population) दिसून येते.

19. 'पर्याप्त लोकसंख्या' ही संकल्पना **आर्थिक** स्वरूपाची आहे.

20. 'उपलब्ध साधन संपत्ती आणि लोकसंख्या यांचा सुयोग्य मेळ बसणे म्हणजेच **'पर्याप्त लोकसंख्या'** होय'.

21. **पर्याप्त लोकसंख्या (Optimum Population) या संकल्पनेचे मूल्यमापन** करण्यासाठी खालील कसोट्या मूलभूत म्हणून वापरता येतात.

1. दरडोई उत्पन्न, 2. सरासरी राहणीमान, 3. रोजगाराचा स्तर, 4. आयुर्मान, 5. परावलंबीतांचे प्रमाण, 6. सामाजिक ऐक्य, 7. कौटुंबिक स्वास्थ्य, 8. ज्ञानधारणा, 9. दरडोई अन्नग्रहण, 10. अन्नावरती होणारा खर्च, 11. भूमी उपयोजनाचे प्रमाण, 12. संतुलित लोकसंख्येची रचना आणि 13. प्रमाणबद्ध साधनसंपत्तीचा विकास.

22. **विसाव्या** शतकामध्ये जगाने लोकसंख्येचा विस्फोट अनुभवला.

23. लोकसंख्येचे **असमान वितरण** हे जगभरातील लोकसंख्या वितरणामधील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

24. मानवी इतिहासाच्या **पहिल्या टप्प्यामध्ये** लोकसंख्येची वाढ गोगलगायीचा गतीने झाली असे म्हटले जाते.

25. भारतातील **केरळ** या राज्यांमध्ये स्त्री-पुरुष प्रमाण (Sex-Ratio) सर्वाधिक आहे.

26. जगभरातील अनेक प्राचीन संस्कृती या **नद्यांच्या खोऱ्यात** उदयास आल्या.

27. **पश्चिम युरोप** हा अत्याधिक घनतेचा प्रदेश आहे.

28. **कृषी क्रांतीनंतर** जगभरातील लोकसंख्या वाढीचा वेग वाढला.

29. विषुववृत्तीय प्रदेशांमध्ये लोकसंख्येची घनता **कमी** आहे.

30. उष्ण आणि शीत वाळवंटी प्रदेशांमध्ये लोकसंख्या **विरळ** आहे.

31. **हवामान** या घटकाचा लोकसंख्या वितरणावर सर्वाधिक परिणाम होतो.

32. मैदानी प्रदेशामधील लोकसंख्येची **घनता अधिक** असते.

33. **'लोकसंख्या संक्रमण सिद्धांत'** (Demographic Transition Theory) थामसन आणि नोटेसस्टेन यांनी मांडला.

34. सध्या भारत हा देश लोकसंख्या संक्रमणाच्या **तिसऱ्या** अवस्थेमधून संक्रमण करत आहे असे म्हटले जाते.

35. 'लोकसंख्या वाढीचा सिद्धांत' **माल्थस** यांनी मांडला.

36. 1921 हे वर्ष भारतातील **'लोकसंख्येच्या महाविभाजनाचे वर्ष'** म्हणून ओळखले जाते.

37. **11 जुलै** हा 'जागतिक लोकसंख्या दिन' म्हणून साजरा केला जातो.

38. दर 1000 स्त्रियांमागे असणाऱ्या पुरुषांचे प्रमाण म्हणजे स्त्री-पुरुष प्रमाण किंवा लिंग प्रमाण (Sex Ratio) होय.

39. निरनिराळ्या वयोगटानुसार स्त्रिया व पुरुष दर्शविण्यासाठी जो आलेख काढला जातो, त्यास **'लोकसंख्येचा मनोरा' (Population Pyramid)** असे म्हणतात.

40. **भूपृष्ठरचनेचा** लोकसंख्येच्या वितरणावर होणारा परिणाम महत्त्वपूर्ण असतो.

41. मृदा आणि पाणीपुरवठा हे लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे **प्राकृतिक घटक** आहेत.

42. ऑस्ट्रेलियामध्ये कालगुर्ली आणि कुलगार्डी या वसाहती **सोने** या खनिजांच्या उत्खनन कार्यामुळे उदयास आल्या.

43. भारतातील केरळ या राज्याचा साक्षरतेमध्ये (Literacy) **प्रथम** क्रमांक लागतो.

44. जन्म देण्यास योग्य असलेल्या वयोगटातील स्त्रीने प्रत्यक्ष जन्म दिलेल्या मुलांची संख्या म्हणजे **जनन (Fertility)** होय.

45. प्रजोत्पादन क्षमता वयोगटातील स्त्रीने जन्म दिलेल्या मुलांची संख्या म्हणजे **जनन** होय.

46. **'जननक्षमता'** हा शब्द स्त्रीच्या संदर्भात वापरला जातो.

47. व्यक्तीचे **जनन** हे स्त्रीच्या जनक क्षमतेवर अवलंबून असते.

48. दर एक हजार व्यक्तींमागे जन्मणाऱ्या बालकांचे प्रमाण म्हणजे **जन्म प्रमाण (Birth Rate)** होय.

49**. 'स्थूल जनन दर'** (Crude Birth Rate) हा फक्त मुलींच्या पुरताच मर्यादित असतो.

50. 'एखाद्या विशिष्ट प्रदेशात किंवा भागात एका वर्षाच्या काळात जर हजार लोकांमागे मृत पावणाऱ्यांची संख्या म्हणजे **ढोबळ मृत्युदर** (Crude Death Rate) होय'.

51. सर्वसाधारणपणे **भारत, पाकिस्तान, बांगलादेश** या आशिया खंडातील देशांची लोकसंख्या वाढत असल्याचे दिसून येते.

52. जर्मनी, फ्रान्स यासारख्या **पाश्चिमात्य** देशांमध्ये लोकसंख्या घटत चालल्याचे दिसून येते.

53. **जन्म, मृत्यू आणि स्थलांतर** अशा तीन स्वरूपात कोणत्याही देशातील लोकसंख्येच्या प्रमाणात बदल घडून येतात.

54. लोकसंख्याविषयक माहिती संकलित करण्याचा **जनगणना पद्धती** (Census Method) हा एक उत्तम स्त्रोत आहे.

55. **प्रश्नावलीच्या** माध्यमातूनही लोकसंख्येची आकडेवारी संकलित करता येते.

56. 2011 च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या **121 कोटी** इतकी आहे.

57. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण **74 टक्के लोकसंख्या साक्षर** आहे.

58. जिल्हानिहाय विचार करता, भारतातील **'महे' (पाँडिचेरी)** (1176) या जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण सर्वाधिक आहे.

59. भारतातील **ईशान्य दिल्ली** (37346 लोक प्रती चौ. की. मी.) येथे लोकसंख्येची सर्वाधिक घनता दिसून येते.

60. ज्या व्यक्तीला कोणत्याही भाषेतून **लिहिता आणि वाचता** येते अशी व्यक्ती साक्षर समजली जाते.

61. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील **पुरुष साक्षरतेचे प्रमाण 82 टक्के** इतके आहे तर **स्त्री साक्षरतेचे प्रमाण 65.5 टक्के** इतके आहे.

62. 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या वितरण खालीलप्रमाणे आहे.

A} China 19.47 टक्के B} India 17.5 टक्के C} USA 4.5 टक्के D} Indonesia 3.4 टक्के

E} Brazil 2.8 टक्के F} Pakistan 2.7 टक्के G} Bangladesh 2.4 टक्के F} Nigeria 2.3 टक्के

H} Russian Federation 2 टक्के I} Japan 1.9 टक्के.

63. 2011 ची भारतीय जनगणना ही **15 वी जनगणना** होती.

64. **1872 पासून** भारतात दर 10 वर्षांनी जनगणना केली जात आहे.

65. 31 Oct. 2013 रोजी जगाची लोकसंख्या **700 कोटी** म्हणजेच 7 अब्ज इतकी झाली.

66. खंडनिहाय लोकसंख्येची घनता खालीलप्रमाणे:-

A} आशिया 96.4 लोक प्रती चौ. की. मी.

B} आफ्रिका 36.7 लोक प्रती चौ. की. मी.

C} युरोप 72.9 लोक प्रती चौ. की. मी.

D} उत्तर अमेरिका 22.9 लोक प्रती चौ. की. मी.

E} दक्षिण अमेरिका 22.8 लोक प्रती चौ. की. मी.

67. 1949 मध्ये भारतात **'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण पद्धती'** स्थापन करण्यात आले आणि या पद्धतीने भारतातील जन्मप्रमाण व मृत्यूप्रमाणाचे आकडेवारी गोळा करण्याचे काम सुरू झाले.

68. **विकसनशील** देशांमध्ये जनन प्रमाण जास्त व मृत्यू प्रमाण कमी असे चित्र दिसून येते.

69. **लोकसंख्याशास्त्र** (Demography) म्हणजे लोकसंख्येचा अभ्यास होय.

70. भारतातील **उष्ण कटिबंधीय हवामान** हा घटक ही देशातील लोकसंख्या वाढीचे एक प्रमुख कारण सांगितले जाते.

71. **Malthus**, for the first time, identified the problems related to overpopulation.